Tactful Management Research Journal
ISSN :2319-7943
Impact Factor : 2.1632 (UIF)
Vol. 3 | Issue. 5 | Feb 2015
Available online at www.lsrj.in

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यावसायिक व आर्थिक उलाढालीचा अभ्यास

महेश चंद्रभान डाबरे

सहा.प्राध्या , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविघालय, अकोला.

सारांश :

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था आहे. शेतक–यांच्या हितासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार विविध योजनांची अमलबजावणी करते. कृषी उत्पन्न बाजार समिती हा त्याचाच एक भाग आहे. शेतकरी आपला माल बाजार समिती मध्ये आणून विकतात. त्याठिकाणी संपूर्ण नियमांचे पालन होते. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समिती त्याचाच एक भाग आहे. शेतक–यांची पिळवणूक होणार नाही याची काळजी येथे घेतली जाते. त्यामुळे शेतक–यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडून येते.

मुख्य शब्द : कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषीप्रधान, बाजारपेठण

प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी आजही सुमारी ६३ प्रतिशत लोकसंख्या शेतीवर आपला उदरनिर्वाह करून जीवन जगत आहे. भारतात शेती हा मुलभूत व्यवसाय मानला जातो. कारण शेती विकासावरच देशातील उद्योगधंदे, वाहतूक व दळणवळण, बँका व वित्तीय संस्था, विदेशी व्यापार इत्यादींचा विकास अवलंबून असतो. आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून आजही भारतात शेतीचे स्थान महत्वाचे आहे.

सन १९५० मध्ये दातवाला समितीने राज्यभरात नियंत्रित बाजाराचे जाळे असावे अशी शिफारस केली.यानुसार सन १९५५ मध्ये शासनाने कमिशन स्थापन केली. या कमिशनच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने १९ सप्टेंबर, १९६३ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (नियमन) अधिनियम कायदा पास केला. या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात २५ मे, १९६७ मध्ये करण्यात आली.

महाराष्ट्रातील एकूण ३३ जिल्ह्यांपैकी बुलढाणा हा एक जिल्हा. या जिल्ह्यामध्ये एकूण तेरा तालुके आहेत. या सर्वच तेरा तालुक्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. या तेरा कृषी उत्पन्न बाजार समितीत खामगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही मोठी व नावलौकिक असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती आहे खामगाव तालुक्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती बरोबरच इतर शैक्षणिक सोयी, सवतली सुद्धा उपलब्ध आहे. या क्षेत्रातील ७० ते ७५ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आणि शेतीवर आधारित उद्योग आहे. हा परिसर रस्ते उद्योगधंदे, औद्योगिक विकासाच्या बाबतीत पुढारलेला आहे.

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची इमारत भव्य असून ती शहराच्या मध्यभागी आहे. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना २८९८ या साली करण्यात आली. ही कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा बनवण्याच्या अगोदर स्थापन करण्यात आली होती. इंग्रजांच्या काळात ही कापसाची खूप मोठी बाजारपेठ होती. या बाजार क्षेत्रात फक्त खामगाव व त्यालगत १३८ खेडी समाविष्ट आहेत. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचीचे क्षेत्रफळ ८ हेक्टर आर इतके आहे. या समितीचा मुख्य बाजार हा खामगाव असून तिच्या दुय्यम बाजार पेठेची स्थापना अनुक्रमे बोरी अडगाव १९७० आणि पिंपळगावराजा १९९०–९१ या साली करण्यात आली. त्यांचे क्षेत्रफळ पिंपळगावराजा ४ एकर आणि बोरी अडगाव ४ एकर इतके आहे. तसेच उपबाजार म्हणून जनुना येथे गुरेबाजार व मिरची बाजार १७ एकर जागेत सुरू करण्याचा मानस कृषी उत्पन्न बाजार समितीचीचा आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, मुग, उडीद, गहू, तूर, मका व हरबरा या कृषी उत्पादनाची उलाढाल जास्त प्रमाणात होतांना दिसते. खामगाव कृषी उत्पन्न बाजार पेठचा मुख्य वार हा गुरूवार आहे.

जायले विनायक एन. यांनी अकोला जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक विकासाचे विश्लेषणात्मक अध्ययन (१९९१ ते २०००) या आपल्या लघुशोध प्रबंधात अकोला जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचा विशष अभ्यास केला आहे. यात त्यांनी अकोला जिल्ह्यातील पिकांचे उत्पादन, ठरणारे बाजारभाव या विषयी शेतकऱ्यांची मानसिकता व बाजारसमिती शेतकऱ्यांसाठी करित असलेले कार्य त्याचा अभ्यास त्यांनी केला आहे. पोरे जयंत डी. (२००८) यांनी अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणि आत्महत्या-एक विश्लेषणात्मक अध्ययन (२०००-०१ ते २००६-०७) या आपल्या लघुशोध प्रबंधात अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांची शेती न करण्याची मानसिकता, उदासिनता, पर्यायी बाजार समिती व शासनाची धोरणे, पोषक नाहीत. त्यामुळे उदास शेतकऱ्यांच्या वाढलेल्या आत्महत्या आणि शेती व विषयक उत्पादकता याची उदासिनता परिणामी बाजार समितीची कार्य उपलब्धता या व इतर सर्व गोष्टींचा त्यांनी विश्लेषणात्म्क अभ्यास केला आहे. अभ्यंकर भाग्यश्री यांनी अमरावती जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन (१९८५-१९९०) या आपल्या लघुशोध प्रबंधात अमरावती जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचा विशेष अभ्यास केला आहे. या माहितीमध्ये त्यांनी सर्व बाजार समितीच्या कार्याचा सारांश व त्यांच्या कार्यशैलीचा ही उपयोग केला आहे.

अभ्यासाचे महत्व :

या विस्तृत व नावलौकिक असलेल्या बाजारपेठेचे महत्व अनन्यसाधारण आहे. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये येणाऱ्या सर्व कृषी उत्पादनाच्या उलाढालीचा अभ्यास करून त्यामध्ये ठरविल्या जाणाऱ्या शेत मालाचे भाव शेतकऱ्यांसमोर ठरतात. याचा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक त्या बाबीवर संशोधनातून प्रकाश टाकला गेला आहे.

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये येणाऱ्या सर्व कृषी उत्पादनाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना त्यांच्या माल विक्रीबाबत तसेच कृषी उत्पादनाबाबत योग्य ते मार्गदर्शन या माध्यमातून केले जाते.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व व्यवहार पारदर्शकपणे होतात किंवा नाही याबाबत निरीक्षण केले आहे.

बाजार समितीची रचना :

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकूण २४ सभासद आहेत. त्यापैकी १८ सभासद मतदार संघातील आहेत. ७ सभासद व्यापारी संघातील, २ सभासद सहकारी, संस्थेचे, २ सभासद पंचायत समितीचे, ४ ग्रामपंचायत किंवा नगरपालिकांचा व २ नेमणुकिने नेमलेले सहकारी, १ कापूस किंवा शेती विषयातील तज्ज्ञ अधिकारी.

म्हणजेच २४ सभासदांपैकी १८ सभासद सरळ निवडणूकीने निवडून येऊन पदधारण करतात. तर बाकी ४ निवडलेले प्रतिनिधी असतात. परंतु ते सरळ निवडणूकीने न येता नियुक्त केले जातात. फक्त दोनच सरकारी नियुक्त अधिकारी असतात. त्यांना सभेमध्ये मत देण्याचा अधिकार नाही. त्यांची भूमिका फक्त सल्लागाराची असते. बाजार समितीचा कारभार संचालक मंडळाद्वारे चालविला जातो.

बाजार समितीची कार्यपद्धती :

कृषी उत्पन्न बाजार समितीला खालील कार्य किंवा कर्तव्य पार पाडावी लागतात.

१) बाजारात येणाऱ्या लोकांच्या प्रवेशाचे आणि वाहनांच्या वाहतूकीचे नियंत्रण करणे.
२)बाजार समितीमध्ये व्यापार करण्यासाठी जे शेतकरी, ग्राहक बाजारात प्रवेश करतील त्या लोकांच्या वागणूकीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे.
३)व्यापारी, अडते यांना लायसन्स देणे, त्याचे नूतनीकरण करणे, ते नाकारणे किंवा त्यांना दिलेले लायसन्स रद्द करणे.
४)बाजार क्षेत्रातील बाजारात प्रवेश देणे व बाजाराचरा वापर करण्यासंबंधित काही अटी घालणे. त्याचबरोबर बाजार सुस्थितीत ठेवणे व त्याची व्यवस्था पाहणे.
५)बाजार क्षेत्रामधील आवारात कृषी उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीसाठी आवश्यक सोयी-सुविधांची तरतूद करणे.
६)कृषी उत्पन्न बाजार अधिनियमाखाली करण्यात आलेले नियम किंवा बाजार समितीचे उपविधी या अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदी व कार्यपद्धती यांच्या अनुसार अधिसूचित कृषी उत्पन्नाच्या लिलावाचे नियमन करणे व त्यावर देखरेख ठेवणे.
७)अनुसूचित कृषी उत्पादनाची विक्री, त्यांचे मोजमाप करणे, त्या संबंधात द्यावयाची रक्कम आणि त्यांच्या खरेदी-विक्रीच्या संबंधित इतर सर्व बाबी योग्य पद्धतीने करणे, त्यांच्या अंमलबजावणी करणे आणि ते कार्यान्वीत करणे किंवा रद्द करणे या गोष्टींचे नियमन करणे.
८)शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या किमान आधार किंमतीपेक्षा कमी किंमतीत खरेदी विक्री करण्यात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे.
९)संचालकास जरूर असेल त्यानुसार पिके, त्यांची आकडेवारी व बाजार वृत्त या संबंधीच्या माहितीसह अधिसुचित कृषी

उत्पादन, विक्री, साठवण, त्यावर प्रक्रिया, त्यांच्या किंमती व त्यांच्या ने-आण या संबंधी माहिती गोळा करणे, तिचा प्रसार करणे व ती प्रदर्शित करणे.
१०)बाजार क्षेत्रात आणण्यात येणारे किंवा विक्री करण्यात येणारे प्राणी, गुरेढोरे, पक्षी इत्यादीच्या बाबतीत पशुरोग तज्ज्ञांकडून पात्रता प्रमाणपत्र मिळविण्याच्या संबंधात व्यवस्था करणे.
११) कृषी उत्पादनात भेसळ करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि कृषी उत्पन्नाच्या प्रतवारीस व प्रमाणीकरणास चालना देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.
१२)बाजार समितीच्या मते, प्रभावी किंवा आवश्यक असलेल्या माध्यमातून बाजार क्षेत्रातील नियमनाचे फायदे, व्यवहारांची पद्धती, तेथे पुरविण्यात आलेल्या सुविधा यांना प्रसिद्धी देणे.
१३)कृषी उत्पादनाची खरेदी-विक्री आणि तिला साह्यभुत अशा सर्व बाबी यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या व्यवहारामधून निर्माण होणाऱ्या विवादांच्या बाबतीत समझोता करण्यासाठी तरतूद करणे.
१४)आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी कलम १२ च्या तरतूदीच्या अधिन राहून कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादन करणे, धारण करणे किंवा तिचा विनियोग करणे.
१५) कोणताही दावा, खटला, वाद, कार्यवाही अर्ज किंवा लवाद दाखल करणे किंवा त्या संबंधात बचाव करणे किंवा त्या बाबतीत तडजोड करणे.
१६)विहीत पद्धतीने बाजार समितीच्या निवडणूका घेण्यासाठी योग्य ती व्यवस्थ करणे.
१७)बाजार समिती ज्या बाबतीत हक्कदार असेल असे खर्च, शुल्क, पट्टी आणि इतर रक्कम किंवा पैसे आकारणे, वसुल करणे व ते स्वीकारणे.
१८)बाजारात वखार व खरेदी-विक्री यांच्या संबंधातील सुविधा पुरविण्यासाठी संचालकांची मान्यता मिळविण्याच्या अधिन राहून, राज्य शासन व केंद्र सरकार किंवा कोणतीही वित संस्था किंवा आर्थिक मदत मिळविणे.
१९)राज्य खरेदी-विक्री मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून अर्थ संकल्प तयार करणे व त्यानुसार खर्च करणे.
२०)प्रमाण वजने व मापे यांचा एक संच बाजारात ठेवणे.
२१)बाजार क्षेत्रात वापरात असलेले तराजू, वनज व मापे यांची आणि तसेच लाससन्स धारकांनी ठेवलेली लेखी पुस्तके व इतर दस्तऐवज यांची तपासणी करणे.
२२)बाजार समितीच्या नियमांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी योग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.
२३)बाजार समितीने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांना विहित करण्यात आलेले वेतन, निवृत्ती वेतन, रजा भत्ता, अनुकंपा भत्ता, व भविष्य निर्वाह निधी यामधील रक्कम देणे.
२४)बाजार समिती नियमांचा किंवा तरतूदींचा भंग केला असेल तर खटला भरणे किंवा अपराध योग्य त्या पद्धतीने मिटविणे.
२५)बाजार क्षेत्रामध्ये साठवण व वखारविषयक सुविधा पुरविणे.
२६)बाजारात स्वच्छ पिण्याचे पाणी, उपहार गृहे यांची व्यवस्था करणे.

संशोधन पद्धती :

माहिती संकलित करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली व मुलाखत याचा वापर करून माहिती संकलित केली आहे. दुय्यम माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल, वेळोवेळी वर्तमान पत्रात बाजार समितीची प्रसिद्ध झालेली माहिती, संशोधन लेख इत्यादी द्वारा गोळा करण्यात आली.

संशोधनाची उद्दिष्टे :

१)खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खरेदी-विक्रीचे व्यवहार योग्य रितीने होतात किंवा नाही याची पडताळणी करणे.
२)बाजार समितीच्या प्रगतीचे अध्ययन करणे.
३)शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध सोईचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचतो की नाही याचा अभ्यास करणे.
४) सन २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीतील खर्च व उत्पन्नाचा आढावा घेणे.

आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन :

बाजार फी हे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नाचे सर्वात मोठे साधन असते. बाजार शुल्क हे व्यापाऱ्यांनी किंवा खरेदीदारांनी बाजारात खरेदी केलेल्या मालाच्या एकूण किंमतीच्या शेकडा ५ पैसे एवढे आकारण्यात येते. हे शुल्क सरकारी खात्यात जमा करण्यात येते. जेवढी आवक आणि जावक जास्त असते तेवढे बाजार शुल्कापासून मिळणारे उत्पन्न

जास्त असते. ते पुढील तक्त्यात दाखविले आहे.

तक्ता कमांक 1
बाजार फी

क्र.	आर्थिक वर्ष	बाजार फी
१.	२००४-०५	११,२२,३५०
२.	२००५-०६	१२,००,४३०
३.	२००६-०७	१२,७५,२४५
४.	२००७-०८	१४,२०,३२५
५.	२००८-०९	१५,६५,०००
६.	२००९-१०	१६,१०,९००

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक अहवालावरून असे दिसून येते की, समितीच्या फी पासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये दरवर्षी वाढ होत आहे.

परवाना शुल्काद्वारे कृषी उत्पन्न बाजार समितीला खालील प्रमाणे उत्पन्न मिळाले.

तक्ता कमांक 2
परवाना शुल्क

परवाना फी चा प्रकार	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
व्यापारी	५३२००	५२५००	६३९२०	७६०९०	८१९१५	९५६११
कमिशन एजंट	५२३०	६२८०	६३४५	११६३०	१३९५६	१६३८०
प्रक्रिया करणारे	३४२६०	२४५६०	६३७५	७८४०	९५८०	१२०९०
दलाल	२२५	३२०	६४५	८४०	९५०	१००९
व्यापारी	२२५०	३२४०	८९५०	१२०६०	१४९८०	१६८७५
हमाल	२५३६	१५७६	२४०५	२६०९	२८१०	३००५
मेंढरे व बकरी व्यापारी	१२००	१६००	१९४०	२४००	२८९०	३२१०
गुरांचे व्यापारी	२३००	२२००	२८०६	३६३०	५६६०	८९०१
वखारवाला	४०	५०	१०५	१५५	१७५	२०५
मदतनीस	४२	४५	९०	११५	१२५	१४६
गाडी भाडे व वाटणी अभिकर्ता	२२	२०	५५	८५	१३५	१५५
एकूण फी	१०१३०५	७२३९१	९६६३६	११७४५४	१४११७६	१५४५८७

वरील माहिती वरून असे दिसून येते की, व्यापारी आणि कमिशन एजंट व प्रक्रिया करणारे यांच्याकडून मिळणारे परवाना फी पासूनचे उत्पन्न ८२ टक्के आहे. परवाना फी मध्ये दर आर्थिक वर्षाला वाढ होत आहे.

एकूण उत्पन्नाचे विश्लेषण :

बाजार समितीच्या स्वतंत्र उत्पन्नाच्या साधना मध्ये दरवर्षी वाढ होतांना दिसून येते.

तक्ता कमांक 3
एकूण उत्पन्नाचे विश्लेषण

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	तपशिल	रक्कम
१.	२००४-०५	सर्व उत्पन्नाच्या साधना पासून प्राप्त	११२४२५०
२.	२००५-०६	-//-	१३८४२६६
३.	२००६-०७	-//-	१५७९६४७
४.	२००७-०८	-//-	१६७८९४३
५.	२००८-०९	-//-	१८३८२७१
६.	२००९-१०	-//-	१९२६८१२
	एकूण प्राप्ती		९५३२१८९

वरील माहिती वरून असे दिसून येते की, बाजार समितीच्या उत्पन्नात दिवसेंदिवस चांगल्या प्रमाणात वाढ होत आहे.

तक्ता कमांक 4
मुख्य बाजार आणि उपबाजार यांच्यात झालेल्या खर्चाचे विभाजन

अ.क्र.	आर्थिक वर्ष	मुख्य बाजार	उपबाजार	एकूण खर्च
१.	२००४-०५	१२४२००	३०४०३	१५४६०३
२.	२००५-०६	१३६३००	३१२०५	१६७५०५
३.	२००६-०७	११६०७०	३२१२६	१४८१९६
४.	२००७-०८	८९६३०	३७९३०	१२७५६०
५.	२००८-०९	१०३९२०	३६०५०	१३९९७०
६.	२००९-१०	१०७३२५	३७३२५	१४४६५०
	एकूण	६७७४४५	२०५०३९	८८२४८४

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या कृषी उत्पन्न बाजार समितीचे दोन उपबाजार आणि एक मुख्य बाजार आहे. मुख्य बाजारावर आणि इतर दोन उपबाजारावर करण्यात आलेल्या खर्चाच्या प्रमाणात खूप तफावत आहे. उपबाजारांपेक्षा मुख्य बाजार समितीचा खर्च जवळपास दुप्पट आहे.

तक्ता कमांक 5
एकूण खर्चाचे विश्लेषण

अ.क्र.	आर्थिक वर्ष	तपशिल	रक्कम
१.	२००४-०५	सर्व बाबींवर झालेला खर्च	११९२४३४
२.	२००५-०६	सर्व बाबींवर झालेला खर्च	१३१२३४३
३.	२००६-०७	सर्व बाबींवर झालेला खर्च	१४०६६९८
४.	२००७-०८	सर्व बाबींवर झालेला खर्च	१३७१९७२
५.	२००८-०९	सर्व बाबींवर झालेला खर्च	१४२९१३७
६.	२००९-१०	सर्व बाबींवर झालेला खर्च	१४६२०६१
		एकूण खर्च	८१७४६४५

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, बाजार समितीच्या एकूण खर्चात कमी जास्त प्रमाणात वाढ दिसून येते.

तक्ता कमांक 6
एकूण उत्पन्न व एकूण खर्चाचे विश्लेषण

अ.क्र.	आर्थिक वर्ष	उत्पन्न	खर्च	वाढावा
१.	२००४-०५	१२८४५०६	१२३४५६०	४९९४६
२.	२००५-०६	१३८४२६६	१३१२३४३	७१९२३
३.	२००६-०७	१५७९६४७	१४०६६९८	१५२९४९
४.	२००७-०८	१६७८९४३	१३७१९७२	३०६१७१
५.	२००८-०९	१८३८२७१	१४२९१३७	४०९१३४
६.	२००९-१०	१९२६८१२	१४६२०६१	४६४७५१

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नफ्यामध्ये सतत वाढ होतांना दिसून येते.

निष्कर्ष :

१)बाजार समितीच्या एकूण उत्पन्नामध्ये बाजार फी प्रमाणे सरासरी ८० टक्के आढळली.
२)बाजार समितीच्या देयतेचे आणि संपत्तीचे विश्लेषण केल्यानंतर बाजार समितीची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे आढळलेवरील तक्त्यावरून असे दिसून येते की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नफ्यामध्ये सतत वाढ होतांना दिसून येते.
३) बाजार समितीमध्ये दरवर्षी सरासरी ४० ते ४२ कोटी शेती उत्पादनाची उलाढाल होते. तसेच २० ते २२ लाख क्विंटल धान्याची बाजार समिती मार्फत खरेदी विक्री होते.
४)दरवर्षी बाजार समितीमध्ये सरासरी ५ कोटी रूपयांच्या जनावरांची खरेदी-विक्री होते.
५)कृषी उत्पन्न बाजार समितीचा सहा आर्थिक वर्षाचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शनास आले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वाढव्यात दर आर्थिक वर्षी प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे या बाजार समितीची आर्थिक बाजू फार मजबूत दिसून येते.
६)कृषी उत्पन्न बाजार समिती खामगाव चा सर्वात जास्त खर्च कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या वेतन, भत्यावर होतो.
७)कृषी उत्पन्न बाजार समितीला दोन उपबाजार आहेत, तर मुख्य आवार आणि दोन उप बाजार यांच्या खर्चात विसंगती आढळते. मुख्य बाजार समितीच्या आवारावर एकूण खर्चापैकी ७० टक्के खर्च हा मुख्य बाजार समितीवर केलेला आढळतो. तर उरलेला ३० टक्के खर्च दोन उप बाजारावर केलेला आढळतो.
८)बाजार समितीमध्ये मागील सहा आर्थिक वर्षात कापसाची आवक कमी होतांना दिसून आली. परंतु गहू, मुग, उडीद, सोयाबीन, मका या कृषी उत्पन्नाच्या आवकमध्ये वाढ होत गेली.
९)बाजार समितीचे आवाराचे निरीक्षण केल्यानंतर संशोधकास असे आढळून आले की, जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवहार होत असतांना जनावराची प्रवेश शुल्क आणि साक्षांकन शुल्क चुकविण्याची प्रवृत्ती जनावराच्या मालकामध्ये मोठया प्रमाणात दिसून आली. त्यामुळे बाजार समितीची मोठया प्रमाणात हानी होतांना दिसते.
१०)बाजार आवारामध्ये सर्व आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे बाजार समितीमध्ये आवक मोठया प्रमाणात आहे.
११)बाजार समितीमध्ये कृषी उत्पन्नाचे बाजार भाव हे उघड लिलाव पद्धत या पद्धतीने ठरतो. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या कृषी उत्पादनाचा भाव कळतो.
१२) खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाग भांडवलात व उत्पन्नात सतत वाढ होतांना दिसून येते.
१३)कृषी उत्पन्न बाजार समिती काटा, वनज, माप इ. बाबत दक्षता घेते असे दिसून येते.
१४)कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संशोधन करतांना बाजार समिती शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर बाजार समिती शेतकऱ्यांचे कृषी विषयक ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करतांना दिसत नाही.
१५)खत कचरा यांची योग्य विल्हेवाट लागत नाही.
१६)प्राथमिक सोयी सुविधा पुर्णपणे सक्षम नाही.
१७)समितीच्या आवाराची योग्य ती देखरेख होत नाही

संदर्भ ग्रंथ सुची :

१) आपला बुलढाणा जिल्हा, संपादक : काळबांडे, (२००५) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळ, पुणे.
२) थिटे चिंतामण, ऑक्टोबर – (१९९४), ग्रामीण विकासाची गुरूकिल्ली, जनसेवा मुद्रण, पुणे.
३) साळुंके दत्ताजीराव, पवार जगन्नाथराव, (१९८२), महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.
४) देसाई डॉ. श्री. मु., भालेराव डॉ. निर्मल(२००२), कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन पुणे.
५) जोशी श्श.वी. कायमखाने लिला कृ. (१९९८), कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३, ज्ञानदीप प्रकाशन, पुणे.
६) क्षेत्रीय विकास मार्गदर्शिका, (१ फेब्रुवारी, १९९३), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) जायले एन. विनायक – (१९९१-२०००), अकोला जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आर्थिक विकासाचे विश्लेषणात्मक अध्ययन.
८) पोरे. डी. जयंत – (२००८), प्रबंध अकोला जिल्ह्यातील कृषी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणि आत्महत्या – एक विश्लेषणात्मक अध्ययन.
९) अभ्यंकर भाग्यश्री – (१९८५-१९९०), अमरावती जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन.
१०) www.buldhana.nic.in
११) www.khamgaonmarketcommiti.nic.in

महेश चंद्रभान डाबरे
सहा.प्राध्या , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविघालय, अकोला.